# वृक्षतोडणीचा ईस्टर्न 'फ्री'वे?

## झाडे तोडली किती? लावली किती?... 'एमएमआरडीए' अनभिज्ञ



**जयंत होवाळ, मुंबई**

प्रकल्पासाठी झाडे तोडण्याची वेळ आली की त्यांचे पुनर्रोपण करण्याची आश्वासने द्यायची आणि यथावकाश या आश्वासनाला हरताळ फासायचा... सरकारी यंत्रणांची ही हेराफेरी 'ईस्टर्न फ्री वे'च्या निमित्ताने उजेडात आली आहे. या मार्गासाठी तोडण्यात आलेल्या झाडांपैकी ५५० झाडांचे पुनर्रोपण केल्याचा दावा करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात घटनास्थळी ३० ते ४० झाडेच लावल्याचे उघडकीस आले आहे.

**मटा विशेष**

फ्रीवेसाठी ११५५ झाडे कापावी लागतील, असे एमएमआरडीएने सुरुवातीला स्पष्ट केले होते. परंतु 'वनशक्ती' या संस्थेने माहिती अधिकारात मिळवलेल्या माहितीवर नजर टाकल्यास गोंधळ असल्याचे स्पष्ट होते. सुरुवातीला ११५५ झाडे कापणार असे सांगण्यात आले होते. त्यापैकी ४८३ झाडे प्रत्यक्ष कापावी लागतील, ५२८ झाडांचे पुनर्रोपण केले जाईल, तर १४४ झाडांना हात लावण्याची आवश्यकता नाही, असे सांगितलेल्या आकडेवारीवरून दिसते. त्यानंतरची आकडेवारी विसंगत आहे. दुसऱ्या आकडेवारीत फक्त १२४ झाडे कापली जातील, ११७ झाडांचे पुनर्रोपण केले जाईल व ९१४ झाडांना हात लावण्याची आवश्यकता नाही, असे नमूद करण्यात आले. त्यानंतर देण्यात आलेल्या तपशिलात शिवडी येथील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेतील 'रेनॉल्ड कॉलनी'त कापण्यात आलेल्या झाडांपैकी २३४ झाडे नव्याने लावण्यात आली, तर १९९ झाडांच्या पुनर्रोपणाऐवजी तेवढीच झाडे नव्याने लावण्यात आली. आज घडीला १२० झाडे जिवंत आहेत, असे नमूद आहे. याचा अर्थ जेमतेम १२० झाडेच जिवंत असून अजून ३६२ झाडे लावायचीच आहेत, अशी धक्कादायक माहिती स्पष्ट झाली आहे.

प्रत्यक्षात किती झाडे कापावी लागणार होती, किती कापावी लागली नाहीत, किती झाडे लावणे आवश्यक होते, किती झाडांचे पुनर्रोपण करणे गरजेचे होते, परंतु ते झाले नाही, फ्रीवेचा मार्ग बदलणार होते, परंतु मार्ग का बदलला नाही, या प्रश्नांची उत्तरे 'एमएमआरडीए'कडे नाहीत. ज्या झाडांचे पुनर्रोपण शक्यच नाही, त्या झाडांच्या मोबदल्यात नवी झाडे लावतात येतात. परंतु, पुनर्रोपण करता येऊ शकतील, अशा झाडांचे पुनर्रोपण न करता नवी झाडे लावण्याची परवानगी कंत्राटदाराला कशी काय देण्यात आली याचे गौडबंगालच आहे.

झाडे लावण्यात आल्याचा दावा करण्यात आलेल्या ठिकाणी 'वनशक्ती'ने आपला प्रतिनिधी पाठवला असता, प्रत्यक्षात ३० ते ४० झाडेच लावल्याचे आढळून आले, असे संस्थेचे डी. स्टॅलिन यांनी सांगितले. या सर्वच घटनाक्रमाची कागदपत्रे आणि सीडी आम्ही मागितली असून त्यानंतर या हेराफेरीला कोर्टात आव्हान देऊ, असे त्यांनी सांगितले.